# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## ठोक जलदर निर्धारणाचे मसुदा निकष (२०१३-१६) वरील लाभार्थींचे अभिप्राय व प्राधिकरणाचा प्रतिसाद

# ठोक जलदर निर्धारणाचे मसुदा निकष (२०१३-१६) वरील लाभार्थींचे अभिप्राय व प्राधिकरणाचा प्रतिसाद

## अभिप्राय/सूचनांची गटवारी

| अ.क्र. | सुचना व अभिप्राय | संख्या |
|---|---|---|
| (अ) | ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाची पध्दत व धोरणात्मक बाबी | १६ |
| (ब) | घरगुती वापरासाठी प्रशुल्क | ०५ |
| (क) | औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क | ०९ |
| (ड) | कृषी सिंचन प्रशुल्क व समन्यायता | १३ |
| (इ) | शासकीय उपसा सिंचन योजना | ०३ |
| (फ) | खाजगी उपसा सिंचन योजना | ०८ |
| (ग) | पाणी पुरवठा, दर आकारणी, सवलती / दंड व कार्यपध्दती विषयक बाबी | २८ |
| (ह) | प्रदूषण व पर्यावरणासाठी उपाययोजना | ०४ |
| (च) | परिचालन विषयक बाबी (देखभाल दुरुस्ती) | ११ |
| (छ) | सेवा पुरवठादाराच्या जबाबदाऱ्या व मत्ता व्यवस्थापन | १६ |
| (ज) | प्रशुल्कासंबंधित नसलेल्या बाबी | ४८ |
| | **एकूण मुद्दे** | **१६१** |

# ठोक जलदर निर्धारणाचे सुधारित मसुदा निकष (२०१३-१६) अंतिम करताना विचारात घेतलेले मुद्दे

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | **(अ) - ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाची पध्दत व धोरणात्मक बाबी** | |
| १ | उपजीविकेचे पाणी याकरिता पाण्याचे दर कमीत कमी ठरवावेत. उपजीविकेपेक्षा जास्त पाणी वापर करणाऱ्या लोकांना जादा दर लावावेत म्हणजेच स्तरनिहाय जलदराची व्यवस्था असावी. | २०१६-१९ मध्ये विचार करण्याचे प्रस्तावित. |
| २ | स्तरनिहाय दराची रचना (graded rate structure) लोकांच्या देय क्षमतेनुसार असावी. | |
| ३ | जगण्यासाठी किमान पाण्याची गरज या करिता कमी दर असावेत व उपजीविकेच्या पाण्याकरिता जादा दर असावेत. | |
| ४ | उपजीविकेसाठी लागणाऱ्या पाण्याला कमीत कमी दर असावेत व त्यासाठी जादा पाणी वापरल्यास जादा दर असावेत. | |
| ५ | खोरेनिहाय दर आकारणी असावी. ती राज्य पातळी ऐवजी खोरेनिहाय असावी. | फक्त शासकीय उपसा सिंचन योजनांचेबाबत याचा विचार अंतिम निकषात केला आहे. |
| ६ | पाणी टंचाईच्या तारखा व सिंचन हंगामाच्या तारखा या मराठवाडयाकरिता वेगवेगळया आहेत. या दोन्ही तारखा एकच असाव्यात. | २०१०-१३ चे जनसुनावणीमध्ये केलेल्या सुचनेनुसार हंगामाच्या तारखा बदलल्या आहेत. टंचाईबाबत नियमाप्रमाणे तरतुद आहे. |
| ७ | सुरुवातीच्या २ वर्षात फळबागांपासून उत्पन्न मिळत नसताना जलदर न आकारणे | अंतिम निकषात सन २०१०-१३ नुसार आकारणीची |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | योग्य नाही. कारण फळबागा लावणा-यांना हे माहीत असतेच. यास्तव सन २०१०-१३ च्या निकषानुसार किमान दर आकारावेत. | तरतुद ठेवली आहे. |
| ८ | वेळेवर पाणी दिले तर जादा दर आकारावेत. सवलत कोणालाही देवू नये. | Cost Allocation Matrix मध्ये समयोचितता या घटकानुसार याबाबत विचार केला आहे. |
| ९ | आणेवारी आधारावर पाण्याचे दर ठरवावेत. | टंचाई कालावधीत जेव्हा आवर्तने कमी होतात त्यावेळी आवर्तनानुसार आकारणी होते. |
| १० | Cost Allocation Matrix (२०१३-१६) मध्ये सिंचनासाठीचे भारांकन कमी करावे व औद्योगिक वापराचे भारांकन वाढवावे. | भारांकने ही वेगवेगळया घटकांचे आधारावर ( parameters ) दिलेली आहेत. सिंचनाचे अंतिम भारांकन २१ ऐवजी १९ आणि औद्योगिक वापराचे अंतिम भारांकन ५५ ऐवजी ५९ टक्के केले आहे. |
| ११ | नियंत्रण कालावधीत पाण्याचे दर एकच असावेत. प्रतिवर्षी १० टक्के वाढ नसावी. | दर प्रस्तावाचेवेळी उपलब्ध माहितीनुसार केलेल्या अनुमानावर आधारित येणारी वाढ (टक्के) करण्याची तरतुद निकषात केली आहे. |
| १२ | Cost Allocation Matrix मध्ये पाणी वापराचे प्रमाण हा पॅरामीटर अंतर्भूत करावा. | ही बाब विचारात घेवून परिमाण व सुलभ उपलब्धता हा घटक आता Matrix मध्ये घेतला आहे. |
| १३ | कृषी, पेयजल व उद्योग यासाठी प्रमाण व सुलभ उपलब्धतेची प्रतीभारांकने अनुक्रमे ७० टक्के, २० टक्के व १० टक्के अशी असावीत. शिवाय सुचित केलेल्या सुधारित भारांकनानुसार त्या त्या प्रयोजनासाठीचे हिस्से अनुक्रमे १९ | परिमाण व सुलभ उपलब्धता या घटकाची भारांकने अनुक्रमे ६०, १५ व २५ टक्के घेतली असून खर्च विभागणीची टक्केवारी अनुक्रमे १९, २२ व ५९ टक्के |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | टक्के, २० टक्के व ६१ टक्के घ्यावेत. | अशी अंतिम निकषात घेतली आहेत. |
| १४ | स्वामीत्व शुल्क हे वापरलेल्या पाण्यावर प्रशुल्क म्हणून आकारताना वेगळे दाखवावेत, त्यांने पारदर्शकता वाढेल. (वैद्यनाथन् समितीची शिफारस) | निकषात स्वामीत्व शुल्काच्या बाबीचा अंतर्भाव नाही. परंतु ज्यांनी धरण/बंधारा मध्ये भांडवली गुंतवणूक केली त्यांना मुळ दराचे १६ टक्के नुसार आकारणीची तरतुद निकषात केली आहे. |
| १५ | Cost Allocation Matrix मध्ये घरगुती वापरास उद्योगापेक्षा अधिक भारांकन देण्यात आले आहे. तथापि उद्योगांमुळे होणारे प्रदुषण गुणात्मकदृष्टया घरगुती वापरामधून होणाऱ्या प्रदुषणापेक्षा अधिक हानिकारक असते. सबब भारांकनाचा पुनर्विचार व्हावा. | पाण्याच्या गुणवत्तेवरील परिमाणाच्या घटकाचे भारांकन सुधारित मसुदा निकषात कृषी, घरगुती व औद्योगिक साठी १३, ५४ व ३३ टक्के होते ते आता अंतिम निकषात १०, ४५ व ४५ टक्के असे घेण्यात आले आहे. |
| १६ | कृष्णा लवादामध्ये पिण्याच्या पाण्याच्या तरतुदीबद्दल किंवा वापराबद्दल तरतुदी आहेत, त्याचा उल्लेख प्राधिकरणाच्या निकषामध्ये नाही. त्याचा समावेश करावा. | पिण्याच्या पाण्याचे मुळ/अनुज्ञेय दर हे स्त्रोतानुसार/प्रत्यक्ष वापराच्या परिमाणावर अवलंबून राहणार आहेत. लवादाच्या निर्णयामध्ये पिण्याचे पाण्याची भविष्यातील गरज विचारात घेवून तरतुद केली जाते. त्याचा दराशी थेट संबंध येत नाही. |
| | **(ब) - घरगुती वापरासाठी प्रशुल्क** | |
| १ | STP उभारण्यामध्ये भांडवली गुंतवणूक असल्याने त्यासाठी लागणा-या वित्तीय पुरवठयास वेळ लागतो. सबब दंडात्मक कार्यवाहीबाबत शिथीलता असावी. | २०१०-१३ चे निकषात सर्व महापालिकांकडून त्यांचे, याबाबतचे नियोजन कळविण्याचे आदेश होते. फक्त नियोजन काय हे वेळेत कळविलेले नसलेल्या |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | | महापालिकांना हे लागू आहे, सर्वांना नाही. या विषयाचे गांभीर्य ध्यानात घेवून अंतिम निकषामध्ये STP उभारणीसाठीचा फंड (corpus) हा Retail Tariff च्या बरोबर वसुल करण्याची कार्यवाही न केल्यास दि.३१/१२/२०१४ नंतर दंडनीय आकारणीत दर सहा महिन्यांनी ५० टक्के वाढ करण्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| २ | कार्यरत STP मधून प्रक्रिया केलेले पाणी MPCB च्या मापदंडात असल्याने प्रत्यक्ष पाणी वापरात कमी दराने आकारणी व्हावी. | MPCB च्या मापदंडाप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करणे ही संबंधित वापरकर्त्याची जबाबदारी आहे. त्यामुळे कमी दराने आकारण्याचा प्रश्न येत नाही. |
| ३ | पाण्यासाठी आरक्षण केल्यास तेवढया पाण्याची पूर्ण आकारणी करावी. | २०१३-१६ चे निकषात अगोदरच प्रस्तावित आहे. |
| ४ | औद्योगिक पाणी वापरकर्त्याने जर त्याचे सांडपाणी योग्य पध्दतीने उचित प्रक्रिया करुन नदी / नाले यामध्ये सोडले नाही तर त्याचा पाणी पुरवठा बंद करण्याची तरतूद आहे, पण महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांचे सांडपाणी प्रक्रिया न करता नदी / नाले यांमध्ये सोडल्यास त्यांचे पाणी बंद करण्याची तरतूद आहे का याचा खुलासा, व्हावा. | सांडपाणी शुध्दिकरणासाठी निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधा (STP इ.) खर्चिक असल्याने आणि पिण्याच्या पाण्याची बाब संवेदनशील असल्याने पाणी बंद करण्याची तरतुद ठेवलेली नाही. तथापि, STP उभारणीसाठीचा खर्च Retail Tariff च्या माध्यमातून वसुल करण्याची कार्यवाही न केल्यास दि.३१/१२/२०१४ नंतर दंडनीय आकारणीत दर सहा महिन्यांनी ५० टक्के वाढ करण्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ५ | महानगरपालिकेने / नगरपालिकेने प्रक्रिया केलेले सांडपाणी (sewage) विकण्यावर बंधन आणले पाहिजे. | निकषातील परिच्छेद १३.२.२ (एक) प्रमाणें प्राधिकरण कार्यवाही करील. |
| | **(क) - औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क** | |
| १ | औद्योगिक क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची आकारणी घरगुती वापराचे दराने व्हावी. व्यापारी दराने करु नये. | याची तरतुद निकषात आहे. ( १३.३.१.(पाच) ) |
| २ | Bisleri च्या १ लिटर पाण्याकरिता ५ लिटर पाणी लागते. यास्तव पाण्याचा नाश होतो. त्याकरिता पाण्याचा कच्चा माल वापरणाऱ्या उद्योजकांसाठी अनुज्ञेय असलेल्या सध्याच्या दरामध्ये वाढ करावी. | २०१३-१६ च्या अंतिम निकषात ही सुचना विचारात घेऊन यासाठीचे दर औद्योगिक वापराच्या मुळ दराच्या २५ पट केले आहेत. |
| ३ | पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर करण्याकरिता प्राधिकरणाचा सध्या दर जो ५ पट आहे तो फारच कमी असून तो रु.५/-प्रति घनमीटर करावा. म्हणजेच तो सध्याच्या दराच्या २० ते २५ पट करावा. | |
| ४ | पाण्याचा वापर कच्चा माल म्हणून करुन सिंचनाचे पाणी उद्योगाकरिता वापरणाऱ्या उद्योजकांना मोठया प्रमाणावर फायदा मिळतो. यास्तव त्यांना पिण्याच्या पाण्याच्या सध्याच्या ५ पट दराऐवजी १० पट दराने पाणी द्यावे. | |
| ५ | उद्योजकांना औद्योगिक वापराचे दर वाढवू नयेत. | २०१३-१६ चे Cost Allocation Matrix मध्ये औद्योगिक वापराचे allocation २०१०-१३ पेक्षा कमी आहे. हे अंतिम भारांकन ६३ ऐवजी ५९ टक्के केले आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ६ | इथॅनोल बनविणाऱ्या साखर कारखान्यांना पाणी वापरा प्रीत्यर्थ ५ पट दर लावले आहेत ते कमी करावेत. | शासनाने साखर कारखान्यातून तयार होणाऱ्या इथॅनोलसाठी ४० रु.प्रती लिटर प्रमाणे विक्रीचा दर कायम केलेला आहे. त्या तुलनेत पाण्याच्या कच्च्या मालाची नवीन निकषानुसार किंमत फक्त १० ते १२ पैसे प्रती लिटर साखर कारखान्यांना द्यावी लागणार आहे. |
| ७ | उद्योगांनी आपले उत्सर्जीत जल नदी-नाल्यात सोडून प्रदूषण केल्यास गंभीर गुन्हा मानावा. त्यास शिक्षेची तरतुद असावी. | MPCB चे कार्यक्षेत्रातील बाब आहे. प्राधिकरण कायद्याचे तरतुदीनुसार 'प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी' या तत्वानुसार निकषात दंडनीय आकारणीची तरतुद केली आहे. |
| ८ | लाभक्षेत्रातील तसेच जलाशयाचे १ किमी चे परिसरात (प्रभाव क्षेत्र) tube wells व open wells यामधून उपसून उद्योजक पाणी वापरतात. त्याची आकारणी जलसंपदा विभाग करीत नाही. | २०१३-१६ चे निकषात आता याबाबतची तरतुद केली आहे. |
| ९ | म.औ.वि.म. च्या क्षेत्रातील जे उद्योग उत्सर्जित पाण्यावर प्रक्रियायुक्त करुन त्याचा पुनर्वापर व तदनुषंगिक मागणीत घट करीत असतील त्यांना निकषातील सवलतीचा लाभ मिळत नाही. | या बाबतची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| | **(ड) - कृषी सिंचन प्रशुल्क व समन्यायता** | |
| १ | जलसंपदा विभागाकडून रबी हंगामात ज्यावेळी १ किंवा २ आवर्तने दिली असतानाही पूर्ण हंगामाची आकारणी होते. आवर्तननिहाय आकारणी होणे | दि. २९/६/२०११ चे शासनाच्या आदेशात अगोदरच सदरील तरतुद आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | गरजेचे आहे. | |
| २ | शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचे दर शेतकरी ठरवित नाही, परंतु उद्योगामधून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचे दर उद्योजक ठरवितात याचा विचार दर ठरविताना करावा. | Cost Allocation Matrix मध्ये परवडण्याची क्षमता (affordability) चे भारांकन ठरविताना ही बाब अगोदरच विचारात घेतली आहे. |
| ३ | जे शेतकरी ठिबक सिंचनाचा वापर करतील त्यांना निकषाच्या परिच्छेद १३.१.२.२(२) नुसार अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दर असण्याची सवलत त्या ऐवजी ५० टक्के आकारण्याची करावी. जे ठिबक करणार नाहीत त्यांना १५० टक्के दर असावा. तसेच ठिबक करणा-यांकरिता शासनाचे अनुदान मिळण्यास लहान शेतकऱ्यास बराच वेळ लागतो. यास्तव ही तरतूद प्रस्तावित जून २०१५ या मुदती ऐवजी जून २०१६ झाल्यास ही तरतूद वगळावी. | यानुसार ठिबक व तुषार जुलै २०१६ पासून अनिवार्य करण्याची आवश्यक तरतुद अंतिम निकषात केली आहे आणि तोपर्यंत पूर्वीची दंडनीय तरतुद वगळली आहे. |
| ४ | दि. २९/६/२०११ च्या शासन निर्णयानुसार पा.वा.सं. ना घनमापन पध्दतीने पाणी वितरण करताना कालव्याचे मुखाशी दिलेल्या पाण्याचे परिमाणास लघु वितरिका स्तरावरील विहित केलेले दर प्रकल्पस्तरीय पा.वा.सं. ला लावले गेल्याने (वाघाड प्रकल्प) वहनव्यय इ. भार प्रकल्पस्तरीय पा.वा.सं. ला पडला हे २०१०-१३ च्या निकषाशी सुसंगत नाही. वास्तविक सिंचनाचे बाबतीत वहनव्यय शासनाने सोसण्याची तरतूद आहे. | २०१०-१३ साठी जलसंपदा विभागास याबाबत योग्य त्या सुचना निर्गमित करण्यात येत आहेत व २०१३-१६ करीता याबाबत अंतिम निकषात तरतुद केली आहे. |
| ५ | लाभक्षेत्राच्या बाहेर तसेच जलाशयापासून काही अंतरावर मोठे शेतकरी विहिरी घेवून सिंचनाकरिता पाणी घेतात. त्यावर जलसंपदा विभाग आकारणी करीत | २०१३-१६ चे निकषात याबाबत आकारणी करण्याची तरतुद केली आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
| --- | --- | --- |
| | नाही. | |
| ६ | गव्हाचे पिकास कमी आवर्तने झाल्यास कमी आकारणी व्हावी. | दि. २९/६/२०११ चे शासन निर्णयामध्ये याबाबत अगोदरच तरतुद आहे. |
| ७ | पाणीपट्टी थकबाकीदार असलेला शेतकरी साखर कारखान्यांकडे पाणीपट्टी भरण्याचे टाळत असल्याने ऊसाची पाणीपट्टी संबंधित साखर कारखान्यांनी भरणे बंधनकारक करण्यात यावे. | शासनास याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| ८ | आदिवासी उप योजनेत असणाऱ्या सिंचन प्रकल्पांवर आदिवासींना सूट आहे. ही सूट सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात असणा-या सर्व आदिवासींना लावावी. | २०१३-१६ च्या निकषात याबाबत आवश्यक तरतुद केली आहे. |
| ९ | आदिवासींमध्ये भेदभाव न करता प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व आदिवासींना दरातील सवलत उपलब्ध करावी. | |
| १० | सर्व आदिवासींना पाणी मोफत मिळावे. फक्त आदिवासी उपयोजने अंतर्गत जी सवलत आहे ती सर्व प्रकल्पांवरील आदिवासींना उपलब्ध करावी. | |
| ११ | आदिवासींना मोफत पाणी नको, वेळेवर पाणी द्यावे. | |
| १२ | आदिवासी शेतकऱ्यांना पाण्याच्या दरामध्ये सवलत देतांना सर्वच आदिवासी शेतकऱ्यांना समान निकष लावावेत. | |
| १३ | पालखेड चारी क्र.४६ ते ५२ मधील भागात शेतक-यांना पाणी मिळत नाही. कालव्याची दुरुस्ती व्यवस्थित केली जात नाही. समन्यायी वाटप व्हावे. पिण्याच्या पाण्याकरिता धरणावर स्वतंत्र पाईप लाईन असावी. | पाणी पुरवठयातील अडचणी प्राधान्याने सोडवण्याबाबत शासनास कळविण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | **(इ) - शासकीय उपसा सिंचन योजना** | |
| १ | शासकीय उपसा सिंचन योजनांच्या वीज बिल आकारणीबाबत प्राधिकरणाने प्रस्तावित केलेली पध्दत कायद्याला अनुसरुन नाही.<br>उपसा सिंचन योजनांवरील वीज खर्च हा एकूण प्रचालन व परिरक्षण खर्चाचाच भाग आहे. शासकीय उपसा सिंचन योजनांचा वीज खर्च राज्यातील सर्व सिंचन प्रकल्पांच्या प्रचालन व परिरक्षणाच्या एकूण खर्चात समाविष्ट करुन तो खर्च आधारभूत मानावा. | उपसा सिंचन योजनांवरील वीज खर्च हा एकूण प्रचालन व परिरक्षण खर्चाचाच भाग समजण्यात आलेला आहे व त्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| २ | शासकीय उपसा सिंचन योजनांच्या वीज दर आकारणीबाबत असलेल्या परिशिष्ट ४.१ मध्ये "प्राधिकरणाने वीज आकार, सिंचित क्षेत्र, दर हेक्टरी महसुल आकारणी यांचा तपशील असलेले एक **नमुना वर्ष**--------------" असे जे नमूद केले आहे त्या ऐवजी "**-------------**यांचा तपशील असलेले एक **प्रातिनिधीक वर्ष**--------------" असा शब्दप्रयोग करणे संयुक्तिक राहील. | शासकीय उपसा सिंचन योजनेचे सध्या प्रकल्पनिहाय प्रस्तावित असलेले दर निर्धारणाची पध्दत ही खोरेनिहाय एकच दर ठेवण्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| ३ | उपसा सिंचन योजनांच्या पाणीपट्टीचे दर ठरवितांना वापरकर्त्यांची परवडण्याची क्षमता विचारात घ्यावी. | खोरेनिहाय दर निर्धारित करताना हा मुद्दा विचारात घेतला आहे. |
| | **(फ) - खाजगी उपसा सिंचन योजना** | |
| १ | खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी प्राधिकरणाने प्रस्तावित केलेले सवलतीचे दर कमी आहेत, त्यामध्ये वाढ व्हावी. | खाजगी उपसा सिंचन योजनांचे दर काढण्याच्या सुत्रामध्ये वीज बीलाचा खर्च हा MERC ने निर्धारित |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | | केलेल्या दराप्रमाणे आहे. यास्तव यात बदल करण्याची गरज वाटत नाही. |
| २ | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून खाजगी उपसा सिंचनाच्या विद्युत पंपावर आकारणी कालवा / धरणात पाणी नसताना केली जाते हे बरोबर नाही. ज्यावेळी कालव्यातून पाणी उचलले जात नाही त्यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विद्युत आकारणी करु नये. प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला याबाबत कळवावे. | शासनाचे निदर्शनास ही बाब आणण्यात येईल. तसेच लाभार्थीनी मीटर सीस्टीमचा अवलंब करावा म्हणजे प्रत्यक्ष वापराचे आधारावर आकारणी होईल. |
| ३ | पाणी उचलून वापरणा-या पाणी वापर संस्थांना उपशाचे दर कमी असावेत. | पाणी वापर संस्थांनी ठिबक सिंचनाचा अवलंब केल्यास जादा सवलत मिळेल. |
| ४ | जलाशयातील उपशावर पाणी उपसण्यास कोणतेही बंधन नसते. त्याकरिता त्यांना जादा दर आकारावेत. | या सुचनेनुसार मोठया प्रकल्पांच्या जलाशयावरील उपसा सिंचन योजनांस जादा दर (मुळ दराच्या सव्वा पट) आकारण्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| ५ | सधन शेतकरी अनधिकृतपणे कालव्यावर उपसा करतात. त्यामुळे शेवटच्या भागातील लहान शेतकऱ्यांवर अन्याय होतो, त्यांच्यावर कारवाई करावी. | |
| ६ | जलाशयावर मोठया प्रमाणात अनिर्बंध उपसा आहे. त्यामुळे प्रवाही सिंचनास पाणी कमी राहते. | |
| ७ | सुरुवातीच्या भागातील कालवा उपशास जादा दर असावेत तर शेवटच्या भागातील कालवे उपशास कमी दर असावेत. | कालव्याचा प्रवाह हा खंडित असतो, त्यामुळे जलाशय उपसा सारखा दर वाढविता येणार नाही. तथापि, कालव्याच्या शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याची |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | | हमी देण्याबाबत सेवा पुरवठादारावरील जबाबदाऱ्यांसंबंधी परिशिष्ट ५ मधील परिच्छेद २ नुसार तरतुद केली आहे. |
| ८ | उपशाद्वारे होणारे पाणीवापर जगण्यासाठी व उपजीविकेसाठी आवश्यक किमान पाणी इतक्याच मर्यादेपर्यंत असावा. | २०१६-१९ मध्ये याचा विचार करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | **(ग) - पाणी पुरवठा, दर आकारणी, सवलती / दंड व कार्यपध्दती विषयक बाबी** | |
| १ | सिंचन लाभक्षेत्राची रिमोट सेन्सींगद्वारे मोजणी करुन त्यानुसार आकारणी करावी. म्हणजे कोणतेही सिंचन क्षेत्र आकारणीत वगळले जाणार नाही. | याबाबत आवश्यक तरतुद सेवा पुरवठादाराच्या जबाबदा-यासंबधी परिशिष्ट ५ मधील परिच्छेद १ नुसार अंतिम निकषात केली आहे. |
| २ | बिगर सिंचनासाठी पाण्याची हक्कदारी देताना ग्रामीण भागातील जनतेस द्यावयाच्या पाण्यामध्ये जनावरांना लागणाऱ्या पाण्याचा समावेश केला आहे किंवा कसे याचा खुलासा करावा. | मजनिप्रा च्या सुधारित अधिनियमानुसार बिगर सिंचनासाठी पाण्याची हक्कदारी शासनाकडून देण्यासाठीचे निकष प्राधिकरणाने अंतिम केले आहेत. |
| ३ | प्राधिकरणाने सन २०१०-१३ या नियंत्रण कालावधीकरिता पाणी वापर कर्त्याला ज्या सवलती दिल्या होत्या त्याची अंमलबजावणी जलसंपदा विभागाकडून झालेली नाही; ती व्हावी. | यासंबंधी प्राधिकरणाने शासनास योग्य ते निर्देश आधीच दिले आहेत. |
| ४ | प्राधिकरण सिंचनाकरिता ज्या सवलती देते त्याची अंमलबजावणी जलसंपदा विभागाकडून होत नसल्यामुळे सवलती काय आहेत याची माहिती प्राधिकरणाने जाहीर प्रसिध्द करावी म्हणजे सर्वसामान्य लोकांना माहिती होईल. | पाणी वापरकर्त्यांना जलसंपदा विभागाकडून जे पाण्याचे बील दिले जाईल त्याच्या पाठीमागे प्राधिकरणाने दिलेल्या सर्व सवलतीचा उल्लेख करण्याचे बंधनकारक करण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ५ | सिंचन प्रकल्पातील पाणी बिगर सिंचनास वळविल्यामुळे शेतीसाठी कमी झालेले पाणी यावर करावयाची उपाययोजना (R-R-R Policy). | प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सिंचनासाठी पुनर्वापर करणाऱ्या वापरकर्त्यांस प्रोत्साहन देण्याची तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| ६ | प्रकल्पग्रस्तांना प्रवाही सिंचनाचा लाभ मिळत नसल्यामुळे त्याला दुसऱ्याकडून जादा दराने पाणी विकत घ्यावे लागते. | प्रकल्पग्रस्तांना दरामध्ये सवलत देण्याची तरतूद अंतिम निकषामध्ये आहे. शासनास प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रात प्राधान्याने सिंचन सुविधा देण्याबाबत कार्यवाही करण्यास निर्देशित करण्यात येईल. |
| ७ | राज्यातील सर्व महसुली विभागात भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे तरी पाणी वापराचे / सिंचनाचे मापदंड वेगवेगळे असावेत. | प्राधिकरण करीत असलेले दर निर्धारण राज्यस्तरीय असून सध्या राज्यस्तरीय पाणी वापराचे मापदंड आहेत. २०१६-१९ मध्ये राज्यस्तरीय तसेच खोरेनिहाय सिंचनाचे मापदंड विहित करण्यात येतील. |
| ८ | साखर कारखान्यांना (ॲग्रोबेस्ड इंडस्ट्रीज) सवलती देवू नयेत | साखर कारखाने ग्रामीण भागात रोजगार निर्मित करण्यास मदत करतात. त्यामुळे त्या परिसरातील लोकांचा शहराकडे येणारा ओढा जवळजवळ कमी होतो. यास्तव ही तरतुद अंतिम निकषात ठेवली आहे. |
| ९ | सन २०१६-१९ या नियंत्रण कालावधीच्या निकषाच्या निर्धारणाची प्रक्रिया आतापासून सुरु करावी. या निकषामध्ये उपजीविकेचे पाणी/स्तरनिहाय रचना असावी. तसेच २०१६-१९ साठीच्या दृष्टीनिबंधात सुरुवातीच्या नियंत्रण | प्राधिकरणाच्या दर निर्धारणाच्या विनियमातील तरतुदीनुसार २०१६-१९ साठीच्या दृष्टीनिबंधाची सुरुवात २०१३-१६ चे दरादेश निर्गमित झाल्यानंतर (ऑगस्ट- |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | कालावधीपासून दर रचनेत कसा बदल होत गेला याची माहिती असणे गरजेचे आहे. | सप्टेंबर २०१४ मध्ये) करण्यात येईल. |
| १० | कालव्याच्या वरच्या भागात लाभक्षेत्राबाहेर विहिरी खोदून मोठे शेतकरी पाणी उचलून नेतात. त्यावर जलसंपदा विभागाकडून आकारणी होत नाही. | लाभक्षेत्रातील आणि लाभक्षेत्राबाहेरील प्रभाव क्षेत्रातील त्याचप्रमाणे जलाशयाच्या प्रभाव क्षेत्रातील विहिरींवरील नगदी पिकांस ५० टक्के दराने आकारणीची तरतुद अंतिम निकषात करण्यात आली आहे. |
| ११ | प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात तसेच कालव्याच्या लाभक्षेत्राबाहेर विहिरी खोदून बिगर सिंचनाकरिता (उद्योगांकरिता) पाणी वापरले जाते, त्यावर जलसंपदा विभाग आकारणी करीत नाही. | |
| १२ | लाभक्षेत्रातील विहिरींवरील पाणीपट्टी आकारणी शासनाने माफ केली आहे, त्याचा पुनर्विचार करण्यास शासनास सांगावे. | |
| १३ | लाभक्षेत्रातील विहिरींवर पाणीपट्टीची आकारणी करावी, पाणी मोफत देवू नये. लाभक्षेत्रातील विहिरींवर शासनाने पाणीपट्टी माफ केली आहे. यामध्ये दुरुस्ती होणे गरजेचे आहे. सधन शेतक-यांना पाणी मोफत देवू नये. | |
| १४ | सधन शेतकऱ्यांना जादा दर लावावेत. | नगदी पिकांसाठी दराच्या रचनेमध्ये जादा दर ठेवण्याचे तत्व अंतिम निकषात आहे. |
| १५ | शेतीचे सर्व पाणी मोजून देण्यात यावे. | शासनाने राज्यातील सर्व निर्मित सिचन क्षेत्रावर पाणी वापर संस्था स्थापन करुन पाणी मोजून देण्याची व्यवस्था करण्याचा कालबध्द कार्यक्रम अंतिम निकषात दिलेला आहे. |
| १६ | पाणी मोजून देण्याची व्यवस्था राज्यातील सर्व प्रकल्पांवर झालेली नाही. | |
| १७ | सर्व प्रकल्पांवर पाणी मोजून देण्याची व्यवस्था व्हावी. | |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| १८ | मुंबई महानगरपालिकेने पाणी वापराच्या प्रमाणात धरणाच्या बांधकामासाठी अगोदर निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यांना सवलतीच्या दराने आकारणी व्हावी. सध्या दंडनीय दराने आकारणी होते ती होऊ नये. | ज्यांनी धरणाच्या बांधकामात प्रमाणशीर खर्चाचा वाटा उचलला असेल किंवा धरण ज्यांनी स्वत: बांधले असेल त्यांना अंतिम निकषात आता अनुज्ञेय दराच्या १६ टक्के प्रमाणे आकारणीची तरतुद केली आहे. दंडनीय आकारणीबाबत शासनास पुनर्तपासणी करण्यास सांगितले जाईल. |
| १९ | सर्व सुनावण्या झाल्यानंतर जलदराचे निकष अंतिम करण्यापूर्वी संबंधित सेवाभावी संस्थांबरोबर चर्चा करावी. | अशी चर्चा दि.१७/२/२०१४ रोजी व त्यावेळी उपस्थित राहता न आलेल्या अशासकीय संस्थांबरोबर दि.२५/२/२०१४ रोजी करण्यात आली आहे. |
| २० | जनसुनावणी झाल्यानंतर उपस्थित केलेल्या बाबींपैकी कोणत्या स्वीकारल्या व कोणत्या नाकारल्या याबाबत जाणकार सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर विचारविनिमय व्हावा. | |
| २१ | २०१०-१३ या कालावधीत प्राधिकरणाने तयार केलेल्या जलदराच्या निकषामध्ये दिलेल्या सवलती कागदी सवलती असून प्रत्यक्ष लोकांपर्यंत पोहोचल्या नाहीत. त्यामुळे त्याचा उपयोग होत नाही. | प्राधिकरणाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांसमवेत केलेल्या चर्चेनुसार ही बाब ध्यानात आल्याबरोबर शासनास अशा सर्व सवलती लोकांपर्यंत पोहोचण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश प्राधिकरणाने स्वतंत्रपणे दिले आहेत. |
| २२ | प्राधिकरणाने २०१०-१३ च्या निकषात जमीन धारणेच्या क्षेत्राधारित शेतकऱ्यांना सवलती दिल्या आहेत. त्या ऐवजी त्या जिल्हयात/प्रदेशात मानव विकास निर्देशांक (HDI) च्या आधारावर सवलती द्याव्यात. | २०१६-१९ च्या दर निर्धारणाच्या वेळी याबाबत अधिक तपशील मिळवून या मागणीचा अभ्यास करण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| २३ | प्राधिकरण सिंचनाकरिता ज्या सवलती देते त्याची अंमलबजावणी जलसंपदा विभागाकडून होत नसल्यामुळे सवलती काय आहेत याची माहिती प्राधिकरणाने जाहीर प्रसिध्द करावी म्हणजे सर्वसामान्य लोकांना माहिती होईल. | पाणी वापरकर्त्यांना जलसंपदा विभागाकडून जे पाण्याचे बील दिले जाईल त्याच्या पाठीमागे प्राधिकरणाने दिलेल्या सर्व सवलतीचा उल्लेख करण्याचे बंधनकारक करण्यात येईल. |
| २४ | प्राधिकरणाच्या सुधारित निकषाच्या मसुद्यातील परिच्छेद १३.१.४.१ मध्ये लघु वितरिका स्तरावरील पाणी वापर संस्थांना ज्या सवलती आहेत त्या उच्च स्तरावरील म्हणजे वितरिका / कालवा / प्रकल्प स्तरावरील पाणी वापर संस्थांना नाहीत हे स्पष्ट करावे. | या संदर्भातील योग्य स्पष्टीकरण २०१३-१६ च्या निकषात दिलेले आहे. |
| २५ | दोनपेक्षा जास्त मुले असणाऱ्यांसाठीची दंडनीय आकारणीची तरतूद कायद्यातून वगळावी. | हा प्रश्न शासनाच्या अखत्यारितील आहे. जोवर ही तरतुद कायद्यातून वगळली जात नाही तोवर या दंडनीय आकारणीची तरतुद निकषात ठेवावी लागेल. |
| २६ | जनमानसामध्ये जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे अस्तित्व आणखी जाणवत नाही. महाराष्ट्र वीज नियामक आयोगा (MERC) नुसार लोकांना याची माहिती होण्याचे प्रयत्न करावेत. | हा मुद्दा प्राधिकरणाच्या विचारार्थ आहे. |
| २७ | सन २००५ नंतर २ पेक्षा जास्त मुले असणा-या लाभधारकाला त्याला पाणी हक्कदारी दिली असेल तरच दीडपट दराने आकारणी करण्याबाबत कायद्यात तरतूद आहे. | याची कायदेशीर बाजु तपासण्यात येईल व त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| २८ | पाणी वापर संस्थांकडे जुनी थकबाकी वसुल करण्याची जबाबदारी आहे, ज्या पाणी वापर संस्था वसुली करतील त्यांना प्रोत्साहन देण्याची तरतूद असावी. | हा विषय दर निर्धारणाच्या कार्यकक्षेतील नाही. याबाबत शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यास सुचविण्यात येईल. |
| | **(ह) - प्रदूषण व पर्यावरणासाठी उपाययोजना** | |
| १ | पाणी वापरकर्त्यांच्या गटाकडून जलस्त्रोताचे प्रदूषण मोठया प्रमाणावर होत आहे यावर कोणती उपाययोजना करणार ? | "प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी" या कायद्यात दिलेल्या तत्वानुसार निकषामध्ये प्रदूषण करणाऱ्या गटांना दंडनीय आकारणीची व प्रसंगी पाणी पुरवठा खंडित करण्याची तरतूद दि. १२/११/२०१३ च्या शासन निर्णयात केलेली आहे. याखेरीज महापालिकांनी STP बसवून ते कार्यक्षमतेने चालवावेत याकरिता अंतिम निकषात विविध तरतुदी केल्या आहेत. |
| २ | प्रदूषण तपासणीची यंत्रणा चांगली असावी; त्यात पळवाटा ठेवू नयेत. प्रदूषण करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी. | प्रदूषण तपासणी यंत्रणेबाबतची तरतूद अंतिम निकषात केली आहे. फौजदारी कारवाईची बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारितील आहे. |
| ३ | पाणी वापर संस्थांना अनुदान वेळेवर मिळत नाही. पाणी मोजून देण्याची व्यवस्था राज्यभर करावी. अपूर्ण कामे पूर्ण करावीत. त्यास निधी मिळावा. प्रदूषणकर्त्याने किंमत चुकवावी. याची अंमलबजावणी करावी. | या बाबी पाणी पुरवठा व्यवस्थापनाशी संबंधीत असून शासनास प्राधान्याने याबाबत कार्यवाही करण्यास सुचविण्यात आले आहे. |
| ४ | अमरावती शहराचे प्रक्रिया न केलेले पाणी पेढी जलाशयात जाते. त्यामुळे पाणी दूषित होते. यावर उपाययोजना करण्यात यावी. | या संदर्भात अमरावती मनपा व शासनास सुचना देण्यात येतील. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
| --- | --- | --- |
| | **(च) परिचालन विषयक बाबी (देखभाल दुरुस्ती)** | |
| १ | परिरक्षण व दुरुस्तीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगारावरील संपूर्ण खर्च एकत्रित परिरक्षण व दुरुस्ती खर्चात धरु नये. काही प्रमाणातच कर्मचाऱ्यांचा खर्च जलदर ठरविताना विचारात घ्यावा. | सिंचनाचे दराबाबत वेगवेगळया आयोगाने प्रस्तावित केलेली उच्चतम मर्यादा ज्यावेळी गाठली जाईल त्यावेळी याबाबत विचार करणे योग्य राहील. |
| २ | निकष व जलदर ठरविताना कर्मचा-यांच्या पगारावरील खर्चावर मर्यादा (cap) लावावी म्हणजेच वेतनामध्ये वेळोवेळी होणा-या वाढीचा दरावर जादा भार होणार नाही, याकरिता कर्मचाऱ्यांच्या वेतनाची किती रक्कम दर आकारणीकरिता विचारात घ्यावी याबाबत प्राधिकरणाने काही तरी निर्णय घ्यावा जेणेकरुन कामाचे दर जसा पगार वाढेल तसे वाढणार नाहीत. | सिंचनाचे दराबाबत वेगवेगळया आयोगाने प्रस्तावित केलेली उच्चतम मर्यादा ज्यावेळी गाठली जाईल त्यावेळी याबाबत विचार करणे योग्य राहील. |
| ३ | परिरक्षण व दुरुस्ती ही भांडवली खर्चामधून केलेल्या पायाभूत सुविधांच्या कामाच्या गुणवत्तेवर व सेवा पुरवठादाराने केलेल्या दुरुस्तीच्या कामावर अवलंबून असते, यास्तव त्याचे नियमन प्राधिकरणाकडून व्हावे. | याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे विचारार्थ आहे. |
| ४ | पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कामाची गुणवत्ता चांगली राहिली नाही तर परिरक्षण व दुरुस्ती यावर जास्त खर्च होतो यास्तव भांडवली खर्चामधून जी सिंचनाची सुविधा निर्माण होते त्याच्या कामाच्या गुणवत्तेचे नियमन प्राधिकरणाने करावे. | |
| ५ | पाण्याची गळती कमी करावी व परिक्षण-दुरुस्तीचे नियमन व्हावे. | |
| ६ | परिचालन व परिरक्षणासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगाराची माहिती व | हा मुद्दा प्राधिकरणाच्या विचारार्थ आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | कालवे दुरुस्तीच्या खर्चाची वर्षनिहाय माहिती लोकांच्या माहितीकरिता प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करावी. | |
| ७ | परिरक्षण व दुरुस्तीच्या खर्चासाठीचे अनुदानातून ज्यांनी चांगली कामे केली आहेत व कार्यक्षमता वाढविली त्यांना प्रोत्साहन द्यावे. | राज्यात प्रोत्साहन देण्याची व्यवस्था अगोदरच अस्तित्वात आहे. त्यानुसार कार्यवाही होत आहे. |
| ८ | कालवा परिरक्षण व दुरुस्तीच्या संदर्भात वाल्मीने निकष तयार केले, परंतु त्यानुसार शासनाने देखभाल- दुरुस्तीच्या निकषाचे आदेश काढलेले नाहीत. | शासनाने याबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. |
| ९ | परिरक्षण व दुरुस्तीच्या खर्चाबाबत प्राधिकरणाने डाटाबेस ठेवलेला नाही. | प्राधिकरणाने दृष्टीनिबंधामध्ये याबाबत माहिती दिली आहे व ती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर आहे. |
| १० | कालव्यावरील दरवाजांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. | दुरुस्ती कामासाठी प्राधान्यक्रमानुसार निधी द्यावा, याबाबत सेवा पुरवठादावर जबाबदारी दिली आहे. |
| ११ | ६०० हे. सी.सी.ए. पर्यतचे ल.पा.तलाव व्यवस्थापन लाभधारकांकडे सोपवावे व त्यांच्या दुरुस्तीचे दायित्व शासनाने स्वीकारावे. | शेतक-याचे कायद्यानुसार हे अंतिमतः करावयाचे आहे. |
| | **(छ) - सेवा पुरवठादाराच्या जबाबदाऱ्या व मत्ता व्यवस्थापन** | |
| १ | पाटबंधारे प्रकल्पाच्या कालवा व एकूण वितरण व्यवस्थेतून गळती/चोरी मोठया प्रमाणात होत आहे. त्याचा बोजा सामान्य लाभधारकांवर पडतो. यावर कार्यवाही व्हावी. | जेवढे पाणी वापरले जाते, तसेच जेवढे क्षेत्र भिजले जाते त्याचीच फक्त आकारणी होते. वहनव्यय निश्चितीचा अभ्यास वाल्मीतर्फे चालू आहे. |
| २ | सन २०१०-१३ च्या निकषात सेवा पुरवठादारावर दिलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्तता झाली किंवा कसे याचा अहवाल द्यावा. | याची माहिती दृष्टीनिबंधात काही प्रमाणात दिली आहे. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ३ | सेवा पुरवठादारावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या त्यांच्याकडून पार पाडल्या जातात किंवा नाही यासाठी प्राधिकरणाने यंत्रणा विकसीत करावी. | प्राधिकरण याबाबत कार्यवाही करेल. |
| ४ | सेवा पुरवठादारावरील जबाबदाऱ्यांचे अहवाल त्यांच्याकडून तयार करण्यात यावेत व त्यावर जनसंवाद आयोजित करण्यात यावेत. | प्राधिकरण हक्कदारीविषयक कार्यशाळा घेत असते त्यावेळी चर्चा करता येईल. |
| ५ | प्राधिकरणाने सेवा पुरवठादारावर ज्या जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत त्याचे पालन होते किंवा कसे याबाबतचा अहवाल प्राधिकरणाने त्यांचे संकेतस्थळावर ठेवावा. | याची कार्यवाही २०१६-१९ ला करण्यात येईल. |
| ६ | परिच्छेद १४.७ मध्ये सर्व मोठया व मध्यम प्रकल्पांच्या ठिकाणी कृषी-हवामानविषयक केंद्रे, गाळ सर्वेक्षण केंद्रे स्थापन होतील याची जलसंपदा विभागाने खात्री करावी, असे विधान आहे. त्याबाबत निकषात असणारी तरतूद भौगोलिक परिस्थितीनुसार तसेच जलाशयाच्या आकारमानानुसार निवडक मध्यम व सर्व मोठया प्रकल्पांवर करावी असे सूचविण्यात येते. तसेच त्याचे सनियंत्रण कोणी करावे याचा खुलासा करावा. | भौगोलिक परिस्थितीनुसार मोठया प्रकल्पांवरील व निवडक मध्यम प्रकल्पांवरील अशी हवामानविषयक केंद्राची उभारणी व गाळ सर्वेक्षणाचे कार्यवाहीबाबत तरतुद अंतिम निकषात केली आहे. |
| ७ | पाण्याचे ऑडिट (audit) करावे. चो-या रोखाव्यात. | शासन प्रकल्पनिहाय (मोठे प्रकल्प) ऑडिट करीतच आहे. |
| ८ | अप्पर वर्धा प्रकल्पावरील पा.वा.संना परिरक्षण व दुरुस्तीचे अनुदान मिळत नाही. दुरुस्ती वेळेवर न झाल्यामुळे पाणी वापर संस्थांना पाणी मिळत नाही. | याबाबत शासनास कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे. |
| ९ | पाणी वापर संस्थेला अनुदान वेळेवर मिळत नाही. | |
| १० | पाणी वापर संस्थेला परिरक्षण व दुरुस्तीसाठी (M&R) अनुदान मिळत नाही. | |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ११ | प्राधिकरणाच्या कायद्यातील कलम 11(q) नुसार पाणी वापराची नियंत्रण कालावधीनुसार कार्यक्षमता वाढीसाठीची उद्दिष्टे जलसंपदा विभागास द्यावीत व त्यांचे सनियंत्रण प्राधिकरणाने करावे, याची माहिती पुढील नियंत्रण कालावधीच्या दृष्टीनिबंधात प्रस्तुत करावी. | याबाबत २०१३-१६ च्या दृष्टीनिबंधात याबाबत काही प्रमाणात माहिती दिली आहे. २०१६-१९ च्या दृष्टीनिबंधात आणि निकषात उद्दिष्टे दिली जातील. |
| १२ | सर्व प्रकल्पांवर पाणी मोजून देण्याची व्यवस्था असावी. | शासनाने राज्यातील सर्व निर्मित सिचन क्षेत्रावर पाणी वापर संस्था स्थापन करुन पाणी मोजून देण्याची व्यवस्था करण्याचा कालबध्द कार्यक्रम अंतिम निकषात दिलेला आहे. |
| १३ | पूर्णा प्रकल्पांवरील कालव्याच्या कामाची गुणवत्ता चांगली नाही. कालव्याच्या शेवटच्या भागातील कामे अपूर्ण आहेत. तेथे पाणी मिळत नाही.<br>Tail-to-head असे पाण्याचे नियोजन असावे. | ह्या बाबत सेवा पुरवठादारावर (जसंवि वर) निकषात जबाबदारी निश्चित केली आहे. त्याचे प्राधिकरण सनियंत्रण करेल. |
| १४ | पेनटाकळी प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थांचे प्रश्न अ.अ., बुलढाणा पा.प्र.मं., बुलढाणा यांच्याकडे प्रलंबित आहेत. | अधीक्षक अभियंता, बुलढाणा यांना याबाबत पुनः कळविण्यात येईल. |
| १५ | जे कास्तकार जमीन विकतात त्यावेळी त्यांचेकडे असलेली थकबाकी वसूल होण्यासाठी जिल्हा सह निबंधकाने जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे जेणेकरुन थकित पाणीपट्टी जमिनीच्या खरेदी-विक्रीच्यावेळी तरी वसूल होईल. | याबाबत शासनास धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत सुचविण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| १६ | पाणीवापर कार्यक्षमतेचे विभागनिहाय मापदंड असावेत. तसेच याबाबतची प्रकल्पनिहाय उद्दिष्टये ठरवावीत. | २०१६-१९ मध्ये याबाबत खोरेनिहाय उद्दिष्ट देण्यात येईल. |
| | **(ज) - प्रशुल्कासंबंधित नसलेल्या बाबी** | |
| १ | सिंचनासाठी बांधलेल्या धरणातील पाणी बिगर सिंचनासाठी वळवण्याकरिता अनुसरलेल्या कार्यपध्दतीमुळे सिंचनाचे पाणी कमी होते. | सिंचन पुनर्स्थापनेबाबत धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी होण्यासाठी शासनास कळविले आहे. |
| २ | ठिबक सिंचनामुळे वाचलेल्या पाण्याच्या वापराचे नियोजन काय आहे याबाबत खुलासा व्हावा. | मजनिप्रा च्या कलम १४.४ नुसार कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| ३ | शहराच्या विकासाला मर्यादा घालावी, जेणेकरुन बिगर सिंचनाची मागणी भविष्यात कमी होईल व सिंचनास पाणी उपलब्ध होईल. | शहरीकरणाबाबत कृपया १२ व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा पहावा. |
| ४ | जलाशयाच्या पृष्ठभागावरुन मोठया प्रमाणात होणारे बाष्पीभवन कमी करण्यासाठी उपाययोजना करावी. | तांत्रिक तसेच आर्थिक व्यवहार्यता पाहता सुयोग्य उपाययोजनांचा सद्यस्थितीत अभाव आहे. |
| ५ | प्रत्येक जलाशयातील पाणी पिण्यासाठी, उद्योगांसाठी व सिंचनासाठी कसे वाटून द्यावयाचे याची टक्केवारी कायद्यानुसार ठरवावी. त्यात पुनः बदल करु नये. | ही धोरणात्मक बाब आहे. याबाबत शासनास कळविण्यात येईल. |
| ६ | प्राधिकरणाचे दर २०१०-१३ या नियंत्रण कालावधीत एकच होते पण म.औ.वि.म.ने तळोदा उद्योग क्षेत्रात पाण्याच्या दरात २-३ वेळा वाढ केली. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ च्या किरकोळ दरा (रिटेल टॅरिफ) अंतर्गत बाब आहे. |
| ७ | विशेष निमंत्रितांच्या नेमणुकांबाबत नियम करावेत. | शासनाच्या निदर्शनास आणण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ८ | थर्मल स्टेशनांच्या शीतकरण (cooling) साठी जे पाणी लागते त्याच्याऐवजी हवेच्या सहाय्याने शीतकरण (air cooling) करणे शक्य आहे का हे पहावे. ठिबक सिंचनातून वाचलेले पाणी कोठे नेणार याचा खुलासा करावा. | १) हा तंत्रशास्त्राच्या सुधारणेचा / संशोधनाचा विषय आहे.<br>२) मजनिप्रा च्या कलम १४.४ नुसार वाचलेले पाणी वापरण्याचे प्रस्तावित आहे. |
| ९ | प्राधिकरणाची स्थापना होऊन ८ ते ९ वर्षे झाली. या कालावधीत प्राधिकरणाने काय कामे केली याचा खुलासा व्हावा. | प्राधिकरणाचे वार्षिक अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याबात कृपया वार्षिक अहवाल पहावेत. |
| १० | जलसंपदा विभागात भ्रष्ट अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून पाणीपट्टी आकारणी / वसुलीची कामे व्यवस्थित होत नाहीत. | |
| ११ | राज्य जल मंडळ व राज्य जल परिषद यांच्या बैठका होत नाहीत. | |
| १२ | एकात्मिक राज्य जल आराखडा नसताना प्राधिकरण प्रकल्पांना मान्यता देत आहे हे आक्षेपार्ह आहे. | |
| १३ | १९७६ च्या महाराष्ट्र सिंचन कायद्याचे नियम अस्तित्वात नाहीत, त्यामुळे अंमलबजावणीत अडथळे येतात. | ही बाब शासनाच्या अखत्यारितील आहे. |
| १४ | संयुक्त पाहणीनुसार अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी निधी न मिळाल्यामुळे पाणी वापर संस्थेला सर्वांना पाणी देता येत नाही. यास्तव पाणी वापर संस्थेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अनुदान मिळावे. | शासनास निधी देण्याबाबत कळविण्या येईल. |
| १५ | पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्राच्या शेवटच्या भागात शेततळी घेण्याचे धोरण असून कृषी विभाग त्यालाच फक्त अनुदान देते. प्रकल्पाच्या लाभक्षेत्राच्या सर्व | धोरणात्मक निर्णय घेण्यास कृषी / जलसंदा विभागास कळविण्यात येईल. |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | भागात शेततळी घेण्यास कृषी विभागाचे अनुदान मिळावे, म्हणजे लाभक्षेत्रात सर्व ठिकाणी ठिबक सिंचन करता येईल. | |
| १६ | लोकसंख्या वाढली त्यानुसार पाण्याचे आरक्षण वाढवावे. | धोरणात्मक निर्णय घेण्यास जलसंपदा विभागास कळविण्यात येईल. |
| १७ | उद्योजकांनी त्यांच्या पाणी वापरासाठी स्वत: धरणे बांधून सिंचनासाठीचे पाणी वापरु नये. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने काही ठिकाणी असे उपक्रम राबविले आहेत. |
| १८ | पालखेड चारी क्र. ४५ ते ५२ वरील को.प. बंधारे भरुन देण्याची तरतूद करावी. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| १९ | गिरणा डाव्या कालव्या अंतर्गत पाणी वापर संस्थांची अपूर्ण कामे पूर्ण करावीत. | |
| २० | श्री. साईबाबा संस्थान, शिर्डीला उन्हाळयात पाणी मिळत नाही. | |
| २१ | ठिबक सिंचनाच्या अंमलबजावणी करण्याकरिता शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात शेततळी घेण्याची परवानगी असावी. | |
| २२ | बोबडी नाला या ल. पा. प्रकल्पांची ब-याच दिवसांपासून धरणाची कामे अपूर्ण आहेत. निधीची तरतूद नाही. | |
| २३ | ठिबकचे संच बसविण्यासाठी अनुदानाची मर्यादा ९० टक्के पर्यंत वाढवावी. | |
| २४ | तिसगांव धरण भरत नाही. नियोजनात असलेल्या त्रुटी दूर कराव्यात. | |
| २५ | गिरणा नदी उपखोऱ्यात पावसाळयानंतर जर गिरणा धरणात पाणी कमी असेल तर उपखो-यातील पाण्याचे नियोजन करावे. | |
| २६ | इंडिया बुल्स यांनी स्वत:ची धरणे बांधावीत. पाण्याची गळती कमी करावी. | |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | पाण्याची कार्यक्षमता वाढवावी. बाष्पीभवन कमी करावे. | |
| २७ | पाण्याचे खाजगीकरण करु नये. | |
| २८ | प्रकल्पांच्या किंमती वाढतात. त्या किंमती कमी करण्याचा विचार व्हावा. | |
| २९ | पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची क्षमता बांधणी (capacity building) करण्याची गरज आहे. | |
| ३० | पाणी वापर संस्थांबद्दल जागृती कमी आहे. | |
| ३१ | पाणी वापर संस्थांची कामे होत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. | |
| ३२ | अधिकाऱ्यांमध्ये पाणी वापर संस्थेला सक्षम करण्याची मानसिकता नाही. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ३३ | टंचाई काळात जलाशयातील पिण्याच्या पाण्याचे आरक्षण करताना पाणी वापर संस्थांच्या जिल्हा महासंघाला (फेडरेशन) विश्वासात घेतले जात नाही. | |
| ३४ | सहकार कायद्यानुसार स्थापन झालेल्या पाणी वापर संस्थांना २००५ चा शेतकरी कायदा लागू करावा. | |
| ३५ | लोकसहभाग वाढविण्याबाबत प्रयत्न होणे गरजेचे आहे. | |
| ३६ | पाटचा-यांची दुरुस्ती होत नाही. | |
| ३७ | विदर्भातील शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांऐवजी मूल्यवर्धित पिके (cash crops) घेतली तरच शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावेल. | |
| ३८ | ब्राम्ह्यणवाडा प्रकल्पाची गुणवत्ता चांगली नसल्याने शेतकऱ्यास पाणी मिळत नाही. | |

| अ.क्र. | प्राप्त अभिप्राय/सुचना | प्राधिकरणाचा प्रतिसाद |
|---|---|---|
| ३९ | जलसंपदा विभागाचे अधिकारी प्रकल्पाच्या लाभक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना पाणी उचलण्यास परवानगी देतात. त्यामुळे लाभक्षेत्रातील लोकांना पाणी मिळत नाही. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४० | जलदरावर स्थानिक उपकर (local cess) आकारला जातो तो थांबवावा. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४१ | पेंच प्रकल्पावरील शेतकऱ्यांच्या पाणी वापर संस्थेस पाणी मिळत नाही. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४२ | घोडमाझरी तलावावरील हस्तांतरित झालेल्या पाणी वापर संस्थांच्या अपूर्ण कामाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४३ | जसंविच्या अधिकाऱ्यांना कायद्याची अंमलबजावणी करताना मोठया अडचणी येतात. त्या अडचणी सोडविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी मदत करीत नाहीत. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४४ | पाणीनाश टाळण्यासाठी केलेल्या सर्व उपाययोजना काही काळानंतर निकामी होतात. यासाठी उघडया पाणी वितरण व्यवस्थेऐवजी भूमिगत वितरण व्यवस्था (इंदोरे पॅटर्न) राबवावी. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४५ | जलाशयातील गाळ काढून नेणाऱ्या शेतकऱ्यांना सवलती मिळाव्यात. | याबाबत शासनास प्राधान्याने कार्यवाही / धोरणात्मक निर्णय घेण्यास कळविण्यात येईल. |
| ४६ | पाण्याच्या टंचाई काळात गव्हाच्या पिकाऐवजी कमी पाणी घेणारी (उदा.हरभरा इ.) पिके घ्यावीत. | पाणी वापर संस्थांच्या अखत्यारितील बाब आहे. |
| ४७ | शेतीचा लेखाजोखा (audit) ठेवावा. | पाणी वापर संस्थांच्या अखत्यारितील बाब आहे. |
| ४८ | सिंचित शेतीच्या पाणीपट्टीवर पुन्हा स्थानिक उपकर लावू नये. | ग्राम विकास विभागाच्या/शासनाच्या कायद्यानुसार कार्यवाही होते. |